राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/सेवापूर्ती कार्यक्रम/२०२३/ ७७२ दिनांक- 15 FEB 2023

## परिपत्रक –

**विषय- तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय कार्यालये तसेच पदवी व पदविका संस्थामधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवापूर्ती कार्यक्रम आयोजित करण्याबाबत..**

संदर्भ- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.१२/आस्था(२)/२०२३/६९, दिनांक २३/०१/२०२३.

या परिपत्रकाव्दारे सर्व शासकीय कार्यालये तसेच पदवी व पदविका संस्था यांना कळविण्यात येते की, संदर्भिय संचालनालयाच्या पत्रात नमुद केल्यानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीचा सेवापुर्ती सोहळा ज्या विभागात कार्यरत असतात त्याच विभागामार्फत आयोजित केला जातो. असे न करता जे अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांचा सेवापुर्ती सोहळा संस्थास्तरावर एकत्रित करून सोहळयाचे आयोजन करण्यात यावे. सोबत संचालनालयाच्या पत्राची प्रत जोडली आहे.

सदर परिपत्रक आपल्या विभागातील विभागप्रमुखांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-१) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

२) उपसचिव, प्राचार्य,
सर्व शासकीय पदवी/पदविका संस्था/कार्यालये यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६३/४७८,
ई-मेल-desk12@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट:

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पत्र क्रमांक १२/आस्था (२)/२०२३/ ८९ दिनांक : 23 JAN 2023

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पूणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावमती / नागपूर.

विषय : तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय कार्यालये तसेच पदवी व पदविका संस्थांमधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवापूर्ती कार्यक्रम आयोजित करण्याबाबत.

संदर्भ : प्रयोगशाळा सहाय्यक संघटना, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक ३.८.२०२२ रोजीचे विनंती पत्र.

उपरोक्त विषयांस अनुसरून काही शासकीय कार्यालये तसेच पदवी व पदविका संस्थांमधून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीचा सेवापुर्ती सोहळा संस्थास्तरावर एकत्रितपणे आयोजित न करता अधिकारी / कर्मचारी संस्थेत ज्या विभागात कार्यरत असतात त्याच विभागांमार्फत आयोजित केला जातो ही बाब प्रयोगशाळा सहाय्यक संघटनेच्या संदर्भीय पत्रान्वये निदर्शनास आणून देण्यात आली आहे. पत्राची छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

तरी, आपल्या विभागांतील कार्यालय प्रमुख तसेच पदवी व पदविका संस्थेचे संस्थाप्रमुख यांना संघटनेच्या पत्रामध्ये नमूद असल्याप्रमाणे संस्थास्तरावर एकत्रित सेवापुर्ती सोहळा आयोजित करणेबाबत सूचित करावे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
07 FEB 2023
आवक क्र. ९९६०

( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

manasi/letter/letter2023

# तंत्रशिक्षण प्रयोगशाळा सहाय्यक संघटना, महाराष्ट्र

राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना, महाराष्ट्र

[illegible]

संलग्न : तंत्रशिक्षण विभाग कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र

संपर्क कार्यालय : शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद

अध्यक्ष
डी.जी.पाटील
९४०५३६०८२१
Rtd.G.P.Nashik
कार्याध्यक्ष
बी.के.सरोदे
९७६६४१३०३७
G.P.Nanded
मुख्य सल्लागार
डी.एस.कुकडे
पी.के.लांडगे
व्ही.एस.मासोळकर
सचिव
एम.सी.सपाट
मुख्य संघटक
सुनील चोरमले
विजय घानसरे
महिला संघटक
मनिषा दुधे
मंगल कर्पे
सहसचिव
विजय तुराळकर
डी.एस.बंजारी
सहसंघटक
पी.एस.नवघर
आर.पी.डोईफोडे
कोषाध्यक्ष
ए.जी.सराफ
मिलिंद हाडे

दिनांक : ३ ऑगस्ट २०२२

प्रति,
मा.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
म.रा.मुंबई

विषय : सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचा-यांचा सेवापुर्ती / निरोप समारंभ आयोजित करणे बाबत

आदरणीय महोदय,

वरील विषयास अनुसरुन विनंती करण्यात येते की, अधिकारी व कर्मचा यांच्यार शासनास दिर्घ कालावधी करीता सेवा देण्यात येते व संस्थेच्या प्रगतीसाठी मोलाचा हातभार लावण्यात येतो. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा क्षण हा त्या अधिकारी व कर्मचा याच्या जिवनातील महत्त्वाचा व भावनिक क्षण असल्यामुळे तंत्रशिक्षण विभागातील सहका यांसोबत जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झालेले असतात. असे असतो तरी अधिकारी किंवा कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड, शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती व काही मोजक्या संस्था वगळता सेवापुर्ती समारंभ संस्था स्तरावर आयोजित न करता विभागात मर्यादित स्वरुपात आयोजित करण्यात येतो. यापुढे सेवानिवृत्त होणा या अधिकारी व कर्मचा यांचा केवळ एखाद्या विभागापुरता सेवापुर्ती समारंभ मर्यादित न ठेवता संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचा यांच्या उपस्थितीत संस्था स्तरावर सपत्नीक आयोजित करण्याबाबत आपल्या स्तरावरुन आदेशित करण्यात यावे ही नम्र विनंती.

आपले विश्वासू

(डी.जी.पाटील) (बी.के.सरोदे)
अध्यक्ष कार्याध्यक्ष

तंत्रशिक्षण प्रयोगशाळा सहाय्यक संघटना म.रा.